ISBN-978-81-951551-6-3

# बौद्ध समाजाच्या समस्या

**Peer-Reviewed**

**Book Chapter**

संपादक

प्रा. डॉ. एस. एम. भोवते

श्रीमती पंचफुला देवी पाटील समाजकार्य

महाविद्यालय खडकी, अकोला.

आधार पब्लिकेशन, अमरावती

Scanned with CamScanner

ISBN-978-81-951551-6-3

# बौद्ध समाजाच्या समस्या

संपादक

**प्रा. डॉ. एस. एम. भोवते**

प्रथम आवृत्ती - एप्रिल २०२१

आधार पब्लिकेशन
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळासमोर,
वि.म.वि. कॉलेजच्या मागे, अमरावती
Email- aadharpublication@gmial.com

मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती
अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स, अमरावती
मुद्रक
आधार पब्लिकेशन, अमरावती
किंमत रू. २००/-
ISBN-978-81-951551-6-3

**सुचना:-** सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

ISBN-978-81-951551-6-3

## शुभ संदेश



" बौद्ध समाजातील लोकांच्या सामाजिक, धार्मीक, आर्थिक आणि शैक्षणिक समस्या " याविषयाला धरून श्रीमती पी.डी.पाटील समाजकार्य महाविद्यालय खडकी, अकोला. आणि आधार सोशलरिसर्च आणि डेवलपमेंट ट्रेनिंगइन्स्टिट्यूट अमरावती, या संस्थांच्या विद्यमाने प्राध्यापका कडून विविध उप विषयावर शोध निबंध मागवून एका बृहद् शोध निबंध ग्रंथाचे निर्माण कार्य हाती घेतलेले आहे. प्रा. डॉ. संदीप भोवते त्याच्या संपादकीय निरीक्षणाखाली सदर शोध निबंध ग्रंथ व्यवस्थीत नटेल मला आशा आहे. हे लेखन कार्य महाविद्यालयातील विध्यार्थी वर्गाचे वैचारिक उन्नयन होण्यास निश्चित लाभदायक ठरेल । मी सर्व लेखक - प्राध्यापकांचे अभिनंदन करतो, आणि या उपक्रमाला अनेक शुभेच्छा चिंतितो !

विश्वनाथ शेगांवकर , IAS (Retd)
माजी मुख्य सचिव. ( तामिळनाडू )
अकोला.

ISBN-978-81-951551-6-3

# अनुक्रमणिका

१) विपश्यना पंथी धम्मीस्टांसाठी बाबसाहेबांचा इशारा /१
**डॉ. सुरेखा ना. पाटील (मेश्राम)**
२) बौध्द समाजातील लोकांना येणाऱ्या आर्थीकसमस्या /१२
**डॉ. एन. एल. गोंडाणे,**
३) बौध्द लोकांच्या समस्या /२१
**डॉ. नंदकिशोर उकंडराव राऊत,**
४) बौद्ध समाजातील लोकांच्या कौंटूबिक,सामाजिकजिवनावर विपश्यनाचा प्रभाव /३४
**डॉ. भिमराव ऋ. मेश्राम**
५) बौध्द समाजातील महिलांच्या शिक्षण विषयक समस्यांचा अभ्यास /५०
**रविंद्र श्रावण मडावी**
६) बौध्द समाजाच्या शैक्षणीक समस्या /६३
**प्रा.प्रदीप राउत**
७) बौध्द समाजातील लोकांच्या शैक्षणिक समस्या'' /६७
**डॉ. संतोष दामोदर पेठे (प्राचार्य)**
८) मानवी समाजाची प्रगती करण्यासाठी बुद्ध धम्माची गरज— /७१
**प्रा. डॉ. मिनाक्षी कांबळे**
९) बौध्द समाजातील स्त्रियांच्या समस्या /८०
**प्रा.डॉ.संजय उत्तम बेंद्रे**
१०) बौध्द समाजातील लोकांच्या आर्थिक समस्या /८६
**प्रा. प्रसेनजित सत्यजीत चिखलीकर**

ISBN-978-81-951551-6-3

११) बौद्ध समाजाच्या राजकीय समस्यांचे विश्लेषणात्मक अध्ययन /९१
**प्रा.डॉ. भारती कृष्णराव देशमुख**
१२) बौध्द समाजातील लोकांना समाजाकडून प्राप्त सामाजिक दर्जाचे अध्यायन /९७
**प्रा. प्रितम जनार्धन बैस,**
१३) बौध्द समाजाचा बदलता सामाजिक दर्जा /१०५
**डॉ. प्रेमसिंग प्रल्हाद जाधव**
१४) बौद्ध समुदायाच्या विविध समस्यांचे अध्ययन /११०
**डॉ. विनायक आर. साखरकर**
१५) बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचे अध्ययन /१२४
**डॉ. एच. यु. पेटकर**
१६) बौध्द समाजाची शैक्षणिक व आर्थिक स्थिती /१३४
**प्रा.मनिषा म. किर्तने**
१७) बौध्द समाजातील स्त्रियांचा सामाजिक दर्जा : एक अभ्यास /१४५
**दिगंबरकुमार प्रल्हादराव लांडगे**
१८) बौद्ध समाजाच्या शैक्षणिक व सामाजिक समस्या /१५३
**नागसेन ग. दामोदर**
१९) बौध्द समाजातील लोकांच्या आर्थिक समस्या - एक अध्ययन /१६१
**डॉ. अस्मिता रामभाऊ ठोंबरे**
२०) बौद्ध समाजाचे संपादन व समस्या /१७०
**प्रा. डॉ. एस. एम. भोवते**
२१) बौध्द समाजाची स्थिती आणि गती /१८०
**प्रा. दिवाकर विश्राम सदांशिव**

5

Scanned with CamScanner

ISBN-978-81-951551-


- https://www.prabhasakshi.com/articles-on-gods/gautama-buddha-was-founder-of-the-religion-of-buddhism
- https://hindi.webdunia.com/current-affairs/navabodh-118010200064_1.html
- https://hi.wikipedia.org/wiki
- https://web.archive.org/web/20190324034829/http://www.indiaspendhindi.com/cover-




ISBN-978-81-951551-6-3

## बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचे अध्ययन

**डॉ. एच. यु. पेटकर**
सहयोगी प्राध्यापक व विभाग प्रमुख समाजशास्त्र विभाग कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, चिखलदरा

भारतीय इतिहासामध्ये बौध्द धम्माचा काळ हा सुवर्णकाळ म्हणून गणल्या गेला. या काळामध्ये भारतात अनेक क्षेत्रामध्ये प्रगती झालेली दिसून येते. विशेषकरुन कला, साहित्य, शिक्षण यामध्ये मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. बौध्द कालखंडामध्ये शिक्षणाला फार महत्त्व प्रदान करण्यात आले होते. शिक्षणामुळेच मानवी समाजाचा विकास हा समतोल होऊ शकतो अशी धारणा होती म्हणून बौध्द कालखंडामध्ये नालंदा, तक्षशिलासारखी मोठमोठी विद्यापीठे अस्तित्वात होती ही विद्यापीठे त्या कालखंडामध्ये जगप्रसिध्द होती. इतरही देशातील लोक या विद्यापीठामधून शिक्षण घेत होती. भारतामध्ये साधारणतः सातव्या शतकापर्यंत बौध्द धम्माचे मोठ्या प्रमाणात अस्तित्व असलेले आपणास दिसून येते. त्यानंतर वेगवेगळ्या धर्मातील लोकांनी आक्रमणे करुन बौध्द संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला व त्यानंतर हळूहळू बौध्द धम्माचा अस्त होत गेला. १९५६ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबडकरांनी एक नवी धम्मक्रांती करुन या देशामध्ये परत बौध्द धम्माला पुनर्जिवीत करुन संपूर्ण देशाला एक नवी दिशा दिली. भारतामध्ये हजारो वर्षापासून जो समाज अस्पृश्य म्हणून गणल्या गेला होता. अनेक अन्याय, अत्याचार त्यांच्यावर झाले त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणून एक नव समाज उभा करण्याचे महान कार्य बौध्द धम्माच्या क्रांतीतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले.

प्रत्येक व्यक्ती, कुटुंब, समाज, देश यांचा विकास हा त्या राष्ट्रातील, देशातील शिक्षण पध्दतीवर अवलंबून असतो. शिक्षण हा मानवी विकासातील महत्त्वपूर्ण घटक आहे. अगदी खालच्या समाजातील, तळागळातील व्यक्तींना विकासाच्या प्रवाहात आणणारा महत्त्वपूर्ण दुवा आहे. योग्य शिक्षण पध्दतीमुळे समाज



Scanned with CamScanner

ISBN-978-81-951551-6-3

बदलता येतो, नवविचार, नवराष्ट्र समतेच्या मूल्यावर आधारीत निर्माण करता येते. दारिद्र्य, बेकारी, विषमता दूर करता येते. नितीमान चारित्र्यसंपन्न कार्यक्षम नागरिक तयार करता येतात. माणसा-माणसातील भेदभाव विसरता येतात व एक आदर्श नवसमाजाची, नवराष्ट्राची निर्मिती करता येते.

वरील विचार भारतामध्ये बौध्द कालखंडामध्ये अस्तित्वात होते परंतु बौध्द धम्मावरील आक्रमणाने वरील विचाराचा अस्त होऊन विषमतावादी विचारांनी माणसांना गुलाम बनविण्याची प्रक्रिया सुरु झाली. अगदी मानवताविरोधी विचार समाजव्यवस्थेमध्ये रुजवून काही समाजद्वेष्ट्यांनी समाजाची फार मोठी हानी केली. अशाही परिस्थितीमध्ये सामाजिक व्यवस्थांना विरोध पत्करुन महात्मा ज्योतिराव फुले व सावित्रीबाई फुले यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये भरीव असे कार्य केले जे अविस्मरणीय आहे. भारतामध्ये अस्पृश्यांच्या व महिलांच्या विकासाचा इतिहास लिहित असताना फुले दांपत्याला पायाभूत माणूनच सुरुवात करावी लागेल. छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मविर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख अशा अनेक महापुरुषांनी शिक्षण प्रसाराचे कार्य करुन समाज जागृती केली व नवसमाज घडविण्याचे कार्य केले. १८८२ साली महात्मा ज्योतिराव फुले यांनी इंग्लंडच्या राणीला निरोप पाठविला होता की, "या देशातील लोकांना काही द्यायचे असेल तर फक्त शिक्षण देण्याची व्यवस्था करा" अनेक समाजसुधारकांनी व कार्यकर्त्यांनी सक्तीच्या शिक्षणाची मागणी सरकारकडे केली होती. शिक्षणाने माणूस घडविता येतो, शिक्षणाने समाज बदलतो यावर वरील समाज सुधारकांचा विश्वास होता. शिक्षणामुळेच अनेक बदल अपेक्षित आहे. माणसाला माणूस म्हणून नवी ओळख निर्माण करण्याचे काम शिक्षण करीत असते.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये फार मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा प्रचार व प्रसार करण्यात आला. आपल्या राज्यघटनेमध्ये देखील अनेक कलमांच्या माध्यमातून शिक्षणाची आवश्यकता व समाज परिवर्तन यास पुरक कशी ठरेल या दृष्टिकोनातून वेगवेगळ्या गटाकरिता शिक्षण दिल्या गेले पाहिजे हे प्रतिपादन केले आहे.



ISBN-978-81-951551-6-3

सिध्दार्थ गौतम बुध्द शिक्षण विषयक विचार प्रकट करताना म्हणतात, "जे सत्य असल्याची जाणीव निर्माण करुन सत्याला छातीठोकपणे स्वीकारण्याची ताकद निर्माण करुन देते त्याला शिक्षण असे म्हणतात"

महान वैज्ञानिक आईन्स्टाईन म्हणतात, "योग्य तो विकास साध्य करण्याकरिता स्वातंत्र्य, चिंतन व निर्णय घेण्याची क्षमता प्रदान करते हा शिक्षणाचा उद्देश असला पाहिजे केवळ ज्ञान मिळविणे नाही"

महात्मा फुले म्हणतात, "योग्य अयोग्याची जाणीव निर्माण करण्याचे काम शिक्षण करीत असते"

अशाप्रकारे महान विद्वानांनी व तत्त्ववेत्यांनी समाज बदलण्याकरिता शिक्षणाचे महत्त्व विशद केलेले दिसून येते.

शिक्षणामुळे समाज बदलू शकतो, स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय व इतरही लोकशाहीची मूल्ये रुजवू शकतो हे सर्व समाजमान्य असले तरी विशेषतः बौध्द समाजातील या संदर्भातील स्थिती जाणून घेणे महत्त्वपूर्ण आहे.

शेवटी शिक्षण म्हणजे काय तर ते माणसांना जगण्याचं बळ देते ते आजच्या शिक्षणातून विद्यार्थ्यामध्ये रुजविण्याची गरज आहे. त्यांची जीवननिष्ठा मजबूत झाली पाहिजे व सामाजिक प्रश्नांबाबत संवेदनशील विद्यार्थी निर्माण झाले पाहिजे.

अनेक सुशिक्षित व शिक्षणाशी संबंधित व्यक्तींसोबत चर्चा केल्याअंतो असे निदर्शनास आले की, अनेक लोक शिक्षणाने सुशिक्षित झाले, सुरक्षितही झाले परंतु शिक्षणाने त्यांची दृष्टी व्यापक व सर्वसमावेशक होण्याऐवजी संकुचित झाली. ते समाजाला स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय ही मूल्य देऊ शकली नाही. त्यांच्या जगण्यामध्ये, वागण्यामध्ये भौतीकता वाढत गेली, या सगळ्याचा परिणाम अप्रत्यक्षरित्या त्यांच्या कर्मावर व समाजावर झाला. त्यातून सामाजिक उदासिनता निर्माण झाली. त्यामुळे एक प्रकारची स्थितीशिलता निर्माण झाली ही सगळी परिस्थिती बदलण्याची गरज आहे. त्याकरिता प्रामाणिकपणे काम करावं लागेल. समाजप्रवाहात चैतन्य निर्माण करावं लागेल. परिवर्तन घडविण्यासाठी ठामपणे उभी



5

Scanned with CamScanner

ISBN-978-81-95155-6-3

राहणारी माणसं आज हवी आहेत ती घडविणारं सामर्थ्य योग्य शिक्षणातून मिळतं असतं.

नॅशनल करिक्युलम फ्रेमवर्क म्हणजे राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा हा एक महत्त्वाचा दस्ताऐवज आहे. गेल्या पन्नास वर्षात ज्या ज्या देशांनी शिक्षणाच्या क्षेत्रात जे नवीन तत्त्वज्ञान आणलं त्याचा त्या त्या देशावर जो सकारात्मक परिणाम झाला त्याची जाणीव या दस्ताऐवजात आहे. त्यातील पहिलं गृहीतक आहे ते म्हणजे मानसिक, शारीरिक क्षमता असलेलं प्रत्येक मूलं शिकू शकतं. त्याला शिकण्याचा अधिकार आहे. दुसरं गृहीतक आहे, मूलं शाळेत जातं तेव्हा त्याचं मन म्हणजे कोरी पाटी नसते. जन्मापासून ते विचार करीत असतं आणि त्याच्या प्रत्येक कृतीमागे काहीतरी हेतू असतो. प्रत्येक मूलाला व्यक्तिमत्त्व असतं. त्याच्या या व्यक्तिमत्त्वाचा आदर होणं गरजेच असतं. तिसरं गृहीतक म्हणजे ज्ञान रचलं जाण. ते कोणाला हस्तांतरीत होत नाही. या सगळ्यामध्ये शिक्षणाची प्रक्रिया ही प्राथमिक गोष्ट आहे. त्यासाठीची संधी उपलब्ध करुनं देणं हे शिक्षणाचं काम आहे.

या सगळ्या विचारसरणीमध्ये असलेल्या पियाजे आणि वायगोस्की या दोन विचारवंतांचे आपण ऋण मानले पाहिजे कारण त्यांनी मूलं लहानपणापासून विचार करतं त्याची विचारप्रक्रिया हळूहळू कशी वाढत जाते त्यातले टप्पे कोणते हे सगळं मांडले. प्रत्येक विषय शिकण्यामागे संस्कृती असते ती शिक्षकाकडून मुलांपर्यंत जात असते त्यामुळे शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते.

**विषयाची निवड :**

संशोधनकर्ता हा मागील वीस वर्षापासून प्राध्यापक म्हणून कार्यरत आहे तसेच तो स्वतः बौध्दधर्मीय आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रामध्ये बौध्द धर्मियांना येणाऱ्या समस्यांचे अगदी जवळून अवलोकन त्यांनी केले आहे.

शिक्षणाशी संबंधित पुस्तके, दैनिक वृत्तपत्रे, पाक्षिके, मासिकामधून येणारे लेख त्यांचे वाचन आणि अनेक धार्मिक, शैक्षणिक कार्यक्रमाच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थी तसेच बौध्द धर्मातील प्रतिष्ठित, तज्ज्ञ व्यक्ती यांच्यासोबत केलेल्या चर्चा



ISBN-978-81-951551-6-3

व निरीक्षणातून संबंधित विषयाबाबत मिळालेल्या महितीच्या आधारावर लेखन करावेसे वाटले. शेवटी अनेक बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांसोबत शिक्षणासंदर्भात त्यांच्या भूमिका व समस्या या विषयांवर चर्चा करुन वरील विषयाची निवड करण्यात आली. यासोबतच समाजातील महत्त्वपूर्ण घटक असलेले शिक्षक बौध्द समाजातील सामाजिक कार्यकर्ते व विचारवंत यांचेशी केलेल्या चर्चेतून या विषयाची निवड केली व त्यातून पुढील समस्या निदर्शनास आल्या.

**उद्दिष्टे :**

१. बौध्द धम्मातील लोकांची शैक्षणिक स्थिती जाणून घेणे.
२. बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांची सामाजिक, आर्थिक स्थिती जाणून घेणे.
३. गुणवत्तापूर्ण विकास जाणून घेणे.
४. शिक्षणातील प्रमुख समस्या जाणून घेणे.

**गृहीतकृत्ये :**

१. बौध्द धम्मातील विद्यार्थी आर्थिक परिस्थितीमुळे उच्च शिक्षण घेऊ शकत नाही.
२. बोध्द धम्मातील विद्यार्थ्यांकडे इतर धर्मियांचा बघण्याचा दृष्टिकोन भेदभावपूर्ण आहे.
३. बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना शाळेमध्ये भेदभावपूर्ण वागणूक दिली जाते.

या विषयाची व्याप्ती फार मोठी आहे. परंतु अनेक विचारवंतांनी, तत्त्ववेत्यांनी व विद्वानांनी वेगवेगळ्या पध्दतीने लिखान केले आहे. आम्ही २०२० पर्यंत भारत महासत्ता होईल असे स्वप्न बघितले परंतु आजची परिस्थिती फार वेगळी बघायला दिसून येते. शिक्षणाने प्रगती होते असे सर्वश्रूत असताना देखील आज शिक्षणावरील शासनाचा खर्च कमी होते आहे व खाजगीकरणाकडे मोठ्या प्रमाणात शिक्षणव्यवस्था वाटचाल करीत आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर शिक्षण जात आहे. एकेकाळच्या दडल्या, पिचल्या गेलेला बौध्द समाज शिक्षणाने पुढे यायला सुरुवात झाली तोच एक नवीन शोषणयुक्त शिक्षण व्यवस्था पुढे येऊ लागली

ISBN-978-81-951551-6-3

त्यामुळे प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या या समाजाला शिक्षणापासून दूर लोटल्या जाऊ लागले त्याचीच प्रचिती काही विद्यार्थी, शिक्षक, समाजकार्यकर्ते, समाजसुधारक, विचारवंत यांनी आपल्या मुलाखतीमधून व्यक्त केली.

**समस्या :**

**१) शाळेतील वागणूक :**

गावातील, शहरातील शाळामध्ये आजही भेदभावपूर्ण वर्तन बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांसोबत करण्यात येते याचे अनेक विद्यार्थ्यांना अनुभव आलेले आहे. शाळेमधील वेगवेगळया कार्यक्रमामध्ये त्यांच्यामध्ये गुणवत्ता असताना देखील त्यांना डावलल्या जाते. त्यांना वेगवेगळया कारणावरुन टोमणे मारणे, त्यांचा आत्मविश्वास कमी करणे एवढेच नाही तर काही शाळा, महाविद्यालयांमध्ये बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना प्रात्याक्षिकांचे गूण जाणीवपूर्वक कमी देणे, काही ठिकाणी या सर्व गोष्टींना अपवाद देखील दिसून येतो परंतु शाळा, महाविद्यालयामध्ये बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांसोबत जाणीवपूर्वक वरील स्वरुपाचे व्यवहार करण्यात येते.

**२) शैक्षणिक वातावरण :**

बौध्द धम्मातील अधिकांश व्यक्ती ह्या ग्रामीण भागात, झोपडपट्टीमध्ये राहतात. त्यामुळे त्यांच्या घरचे वातावरण तसेच ते ज्या ठिकाणी राहतात त्या ठिकाणचे वातावरण चांगले शिक्षणाकरिता पुरक नसते त्यामुळे बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी गोडी निर्माण होत नाही व तो थोड्याफार प्रमाणात शिक्षण घेतल्यानंतर त्यांचा ओढा कामधंदा करण्याकडे वळतो. त्यांच्या घरातील वडिलधाऱ्या व्यक्ती सुध्दा कमी शिकल्यामुळे त्यांना शिक्षणाचे महत्त्व कळलेले नसते त्यामुळे ते आपल्या मुलांना शिक्षणाविषयी योग्य मार्गदर्शन करु शकत नाही उलट त्यांनी घरामध्ये राहून काहीतरी काम करावे अशीच त्यांची इच्छा असते.

**३) आर्थिक परिस्थिती :**



ISBN-978-81-951551-6-3

बौध्द धम्मातील बहुतांश व्यक्ती ह्या रोजमजुरी / कामधंदा करुन आपली उपजिविका भागवित असतात त्यामुळे त्यांचे जीवन हे हलाखिचे असते. आपल्या मुलांच्या शिक्षणाकरिता त्यांच्याजवळ पैसे नसतात. त्यामुळे त्यांच्या मुलांना गावाच्या बाहेर / शहरामध्ये राहून पुढील शिक्षण घेणे कठिण होऊन जाते. आर्थिक परिस्थिती हलाखिची असल्याकारणाने बौध्द धम्मातील विद्यार्थी हे उच्च शिक्षण घेऊ शकत नाही.

**४) शिष्यवृत्ती :**

बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना दहावी उतीर्ण झाल्यानंतर ११ वी पासून त्यांना शिष्यवृत्ती मिळत असते. ही शिष्यवृत्ती वर्षाला दोनदा मिळत होती. पहिला टप्पा दिवाळीत तर दुसरा टप्पा परीक्षेच्या दरम्यान मिळत होता त्यामुळे बरेचसे विद्यार्थी दहावी पास झाल्यानंतर शहरामध्ये पुढील शिक्षणाकरिता जात होती. मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमधून ते भाड्याच्या खोलीचा किराया देत होती व आईवडीलांकडून मिळालेला धान्य, किराणा यावर आपला उदरनिर्वाह करुन शिक्षण घेत होती परंतु आता अनेक वर्षापासून शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही. वर्ष, वर्ष उलटून जाते तरी शिष्यवृत्ती वेळेवर मिळत नाही त्यामुळे या विद्यार्थ्यांचा शहरामध्ये राहण्याचा प्रश्न निर्माण होतो व दहावीनंतर ते कसेबसे अनुपस्थित राहून शिक्षण घेण्याचा प्रयत्न करतात. शिष्यवृती अभावी त्यांना नियमित शिक्षण घेण्यास अडचणो निर्माण होतात.

**५) शिक्षणाविषयी उदासिनता :**

बौध्द धम्मातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उदासिनता निर्माण झ ालेली दिसून येते. त्यांच्याच गावातील त्यांच्या समाजातील उच्च शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांना नोकरी अभावी गावातच रहावे लागत आहे. त्यामुळे इतरही विद्यार्थ्यांच्या मनात उच्च शिक्षणाविषयी उदासिनता निर्माण झालेली दिसून येते. अनेक शिक्षक, पालक देखील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक रुची निर्माण करण्याचा प्रयत्न करीत नाही त्यामुळे विद्यार्थ्यांचे शिक्षणावरुन लक्ष विचलीत होते. अनेक दिवस तो शाळेमध्ये गैरहजर असतो येथूनच विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण सुरु होते. शाळेमध्ये



Scanned with CamScanner

ISBN-978-81-95[illegible]51-6-3

मनोरंजनात्मक पध्दतीने किंवा खेळीमेळीच्या वातावरणात विद्यार्थ्याला शिक्षण दिले जात नाही त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उदासिनता निर्माण होत जाते.

एका सर्वेक्षणातून असे निदर्शनास आले की, शाळेत दाखल होणाऱ्या १०० मुलांपैकी पाचवीचा अभ्यास ४० मूले पूर्ण करतात, ८ वी चा अभ्यास २५ मूले पूर्ण करतात तर पदवीचा अभ्यास एक दोन टक्केच विद्यार्थी पूर्ण करतात. यामध्ये प्रामुख्याने एस. सी., एस. टी. वर्गातील मूले अधिक प्रमाणात दिसून येतात. यावरुन बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांची शिक्षणाविषयीची आवड व ओढ आपल्या निदर्शनास येते.

**६) गुणवत्तापूर्ण शिक्षणाची कमतरता :**

बौध्द धम्मातील अधिक संख्येने लोक ग्रामीण भागात व झोपडपट्टी भागामध्ये राहतात. त्यामुळे अशा भागात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची व्यवस्था नसते. ते विद्यार्थी जि. प., न. प. शाळामध्ये शिकतात. आज या शाळांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण दिल्या जात नाही. आज शहरी किंवा ग्रामीण भागात देखील इंग्रजी माध्यमांच्या शाळा मोठ्या प्रमाणात उघडल्या आहे. परंतु फी अभावी बौध्द धम्मातील अनेक व्यक्ती आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये शिकवू शकत नाही त्यामुळे त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. आज जिल्हा परिषदेच्या शाळेची अवस्था फार दयनिय स्वरुपाची झाली आहे. त्यामुळे या शाळांमधून आजतरी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा करु शकत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळेत प्रामुख्याने एस. सी., एस. टी वर्गातील मुलांची संख्या अधिक आहे त्यामुळे ही मुले गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहतात.

**७) उच्च शिक्षणाची समस्या :**

बौध्द धम्मातील बहुतांश लोक हे दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणारी आहे. यासोबतच ते ग्रामीण भागात व झोपडपट्टी भागात राहणारी आहेत. त्यामुळे त्यांच्यापुढे सुरुवातीपासूनच शिक्षणाचे प्रश्न आहे. त्यासोबतच उच्च शिक्षणाचे प्रश्न तर त्यांच्यापुढे आवासून उभे ठाकले आहे. उच्च शिक्षणासाठी लागणारा खर्च ते करु



ISBN-978-81-951551-6-3

शकत नाही. आज केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकारकडून वेगवेगळ्या प्रकारच्या शिष्यवृत्ती बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना (एस. सी.) करिता मिळतात परंतु मागील दोन वर्षापासून केंद्र शासनाकडून उच्च शिक्षणाकरिता मिळणाऱ्या शिष्यवृतीमध्ये अनेक अडथळे निर्माण झाले आहेत त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे. तसेच व्यावसायिक शिक्षणाकरिता मिळणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये देखील अडचणी निर्माण झाल्यामुळे हे विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणापासून सुध्दा वंचित होत आहे. उच्च शिक्षणाकरिता द्याव्या लागणाऱ्या विविध परीक्षा उतीर्ण करुन देखील अनेक विद्यार्थी शिष्यवृत्तीअभावी उच्च शिक्षणाकरिता परदेशात जाऊ शकले नाही. तसेच काही विद्यार्थी व्यावसायिक शिक्षण देखील घेऊ शकले नाहीत.

प्राथमिक, माध्यमिक व उच्च शिक्षणाकरिता एस. सी. करिता अनेक योजनांच्या जाहीराती वर्तमानपत्रामूधन तसेच शासनाच्या पोर्टलवर आपणास दिसून येतात. परंतु प्रत्यक्षात त्याचा फायदा किती लोकांना मिळतो हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय होऊ शकतो. त्याचप्रमाणे शिक्षणासंदर्भात अनुसूचित जातीकरिता स्वतंत्र अनुदानीत आश्रमशाळा निर्माण करण्यात आल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्याचा दर्जा व त्यातून मिळणारे शिक्षण व राहण्याच्या सुविधा याचाही वेगळा अभ्यास करण्याची गरज आहे.

**निष्कर्ष :**

बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांचे अध्ययन केल्यानंतर ज्या प्रमुख समस्यांचा येथे विचार केला आहे त्यावरुन खालील निष्कर्ष काढता येतात.

१. बौध्द धम्मातील अधिकांश व्यक्ती ह्या ग्रामीण भागात, झोपडपट्टी भागात राहत असल्यामुळे योग्य शैक्षणिक वातावरणाच्या अभावामुळे बहुतांश विद्यार्थी अर्धवट शिक्षण सोडून देतात.

२. वेळेवर शिष्यवृत्ती मिळत नसल्यामुळे बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागते त्यामुळे देखील त्यांच्या शिक्षणात खंड पडतो.



Scanned with CamScanner

३. आपल्या आजुबाजुच्या विद्यार्थ्यांकडे बघून त्यांना शिक्षण घेऊन नोकरी मिळाली नाही म्हणून बौध्द धम्मातील अनेक विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उदासिनता निर्माण झालेली दिसून येते.

४. शासनाच्या योजनांची योग्यप्रकारे अंमलबजावणी होत नसल्यामुळे बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व अनेक योजनांपासून वंचित राहावे लागल्यामुळे त्यांना पुढील शिक्षणाकरिता अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

५. आज शाळा, महाविद्यालयामध्ये बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांसोबत भेदभावपूर्वक वागणूक केल्यामुळे त्यांच्यामध्ये न्युनगंड निर्माण होऊन त्यांना एकटेपणाची भीती वाटते व तो मधेच शिक्षण सोडून देतो.

**शिफारशी :**

१. शिक्षण हे प्रगतीचं दार आहे त्यामुळे बौध्द धम्मातील मुलांच्या शैक्षणिक प्रगतीकडे प्राधान्याने शासनानी लक्ष द्यायला पाहिजे.

२. शासकीय योजनांची योग्यरितीने अंमलबजावणी करुन बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याकरिता प्रयत्न करावे.

३. शासनाने बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती योग्य वेळेत देऊन त्यांना उच्च शिक्षणाकरिता प्रोत्साहित करावे.

४. बौध्द धम्मातील विद्यार्थ्यांकरिता शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करुन देताना जास्तीत जास्त विद्यार्थ्यांकरिता वसतिगृहाची सुविधा उपलब्ध करुन द्याव्या.

**संदर्भग्रंथ सूची :**

आंबेडकर, भिमराव रामजी (२०१६). *भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म.* वर्धा : सुधिर प्रकाशन.

कांबळे, एन. जी. (२००६). *अशोक विजयादशमी धम्मचक्र प्रवर्तन दिन.* नागपूर : दी सोसायटी फॉर प्रोमोटिंग बुध्दिस्ट नॉलेज.

घोरमोडे, के. यु. *भारतीय शिक्षण प्रणालीचा विकास आणि शालेय व्यवहाराचे अधिष्ठान.* नागपूर : विद्या प्रकाशन.





देशपांडे, के. ना. आणि माळी, आ. ल. *भारतीय शिक्षणाचा इतिहास.* पुणे : नुतन प्रकाशन.

करंडे, सतिशकुमार. *ग्रामीण विद्यार्थ्यांच्या समस्या.* पुणे : सुगावा प्रकाशन.

तलवारे, एस. के. (संपा). (२०१५). *मानवतेचे शिल्पकार. भारतीय संविधान विशेषांक.* नागपूर : डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोशिएशन ऑफ इंजिनिअर्स.

भालेराव, संदेश (संपा). (२०१९). *महाकारुनिक तथागत गौतम बुध्द.* दीक्षाभूमी विशेषाक.

H. U. Petkar
Asst. Professor & H.O.D.(Sociology)
Arts,Science & Commerce College,
Chikhaldara



151

Scanned with CamScanner